# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २३/०८/२०१८ रोजी (का.प.क्र.०७) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त

गुरूवार दिनांक २३/०८/२०१८ रोजी (का.प.क्र.०७) मा.सभापती श्री.रेणुकादास(राजु) दत्तोपंत वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील ''मलिक अंबर स्थायी समिती सभागृह'' येथे सकाळी ११:३२ वाजता वंदेमातरम् या गिताने सुरु झाली. सभेला मा.अतिरिक्त आयुक्त,श्री.श्रीकृष्ण भालसिंग, नगर सचिव,श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल

०२. स.स.श्री.ऋषिकेश चंद्रकांत खैरे

०३. स.स.श्री.सिध्दांत संजय शिरसाट

०४. स.स.श्रीमती शेख नरगीस सलीम

०५. स.स.श्री.रूपचंद लक्ष्मण वाघमारे

०६. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे

०७. स.स.श्री.पुनमचंद सोनाजी बमणे

०८. स.स.श्रीमती खान सायराबानो अजमल

०९. स.स.श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखान

१०. स.स.श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर

११. स.स.श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी

१२. स.स.श्री.अब्दुल नविद अब्दुल रशीद

श्री.गजानन बारवाल : देशाचे माजी पंतप्रधान मा.श्री.अटलबिहारी वाजपेयी यांचे दुःखद निधन झाले आणि तसेच माजी क्रिकेटपटु श्री.अजीत वाडेकर यांचे सुध्दा दुःखद निधन झाले त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली देण्यात यावी.

श्रीमती.स्वाती नागरे : स.सदस्यांनी श्रध्दांजलीचा जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

मा.सभापती : भारतरत्न माजी पंतप्रधान मा.श्री.अटलबिहारी वाजपेयी यांचे दुःखद निधन झाले तसेच माजी क्रिकेटपटु श्री.अजीत वाडेकर यांचे दुःखद निधन झाले आहे, त्यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली देण्यात येते.

श्री.गजानन बारवाल : शहरामध्ये ठिक ठिकाणी खुप खड्डे झाले आहे.

मा.सभापती : स.सदस्यांना विनंती करण्यात येते की, मा.खासदार साहेबांनी बैठक आयोजित केली आहे. त्यामुळे जे काही प्रश्न असतील ते नंतरच्या बैठकीमध्ये घेण्यात येतील.

**<u>विषय क्र. ७८ :</u>**

दिनांक १०/०७/२०१८ रोजी (का.प.क्रं.०४) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

मा.सभापती : विषय क्र.७८ मंजुर करण्यांत येतो.

**<u>ठराव :</u>**

दिनांक १०/०७/२०१८ रोजी (का.प.क्रं.०४) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणेस मंजुरी देण्यांत आली.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ७९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शिक्षण विभागात कार्यरत असलेल्या एकूण १३३ बालवाडी शिक्षिका व १३ बालवाडी सेविका यांना मा.स्थायी समिती मंजूर ठराव क्रमांक २११, दिनांक ११/०१/२०१८ नुसार जा.क्र.मनपा/शिक्षण/२०१८/५६, दि.२५/०१/२०१८ रोजीच्या आदेशान्वये दिनांक ०६/११/२०१७ ते दिनांक ३०/०४/२०१८ (उन्हाळ्याच्या सुट्या लागेपर्यंत) पर्यंत तात्पुरती नियुक्ती/मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीत खालील एकूण १३२ बालवाडी शिक्षिका व १३ सेविका या दिनांक १५/०६/२०१८ पासून कार्यरत आहे.

| अ.क्र. | बालवाडीचे नाव | बालवाडी शिक्षिकेचे नाव |
|---|---|---|
| ०१. | कें.प्रा.शा. बेगमपुरा | श्रीमती वाघ प्रभा वामनराव |
| ०२. | प्रा.शा.भावसिंगपुरा | श्रीमती मंगला फलके |
| ०३. | प्रा.शा.भावसिंगपुरा | श्रीमती कल्पना धनबीज |
| ०४. | प्रा.शा.भावसिंगपुरा | श्रीमती नंदा नलावडे |
| ०५. | प्रा.शा. पडेगाव | श्रीमती जावळे निता डी. |
| ०६. | प्रा.शा. पडेगाव | श्रीमती जगताप छाया यु. |
| ०७. | पडेगाव कॉलनी | श्रीमती वाणी एस.डी. |
| ०८. | पडेगाव कॉलनी | श्रीमती सिमा एकलेरे/बाराबोटे |
| ०९. | प्रा.शा. मिटमिटा | श्रीमती ब्राम्हणकर गिता हिरालाल |
| १०. | प्रा.शा. मिटमिटा | श्रीमती भगत एस.डी. |
| ११. | प्रा.शा. आरेफ कॉलनी | श्रीमती शाहीन बेगम (उर्दु) |
| १२. | आप्पावाडी | श्रीमती वंदना गायकवाड |
| १३. | अप्पावाडी बालवाडी | श्रीमती जाधव पी. एस. |
| १४. | मनपा प्रा.शा. ज्युब्लीपार्क | श्रीमती आम्रपाली इंगळे |
| १५. | प्रा.शा. ज्युब्लीपार्क | श्रीमती उर्मीला भातावाले |
| १६. | प्रा.शा. ज्युब्लीपार्क | श्रीमती आसिया बेगम |
| १७. | प्रा.शा. बडीगिरणी | श्रीमती मथुरा जैस्वाल |
| १८. | प्रा.शा. बडीगिरणी | श्रीमती शेख तरन्नुम |
| १९. | प्रा.शा. पोलिस हेड क्वॉर्टर | श्रीमती संगीता देवरे/जगताप |
| २०. | मंजूरपुरा | श्रीमती नुरजहॉं बेगम |
| २१. | प्रा.शा. जुनाबाजार | श्रीमती दया पांगारकर |
| २२. | प्रा.शा. जुनाबाजार | श्रीमती संध्या मैंद |
| २३. | प्रा.शा. नागेश्वरवाडी | श्रीमती शोभा घंटे |
| २४. | प्रा.शा. गरमपाणी | श्रीमती शिला काळे |
| २५. | प्रा.शा. वसंतभुवन | श्रीमती माधुरी बिडवई |
| २६. | प्रा.शा. किराडपुरा नं.१ | श्रीमती सोफिया बानो सै.अब्बास |
| २७. | प्रा.शा. किराडपुरा नं.१ | श्रीमती महेरून्नीसा बेगम |
| २८. | प्रा.शा. किराडपुरा नं.१ | श्रीमती नुसरत बेगम मनसुर खान |
| २९. | प्रा.शा. किराडपुरा नं.२ | श्रीमती एकबाल सीमी |
| ३०. | प्रा.शा. किराडपुरा नं.२ | श्रीमती रूबीना बेगम |
| ३१. | प्रा.शा. किराडपुरा नं.३ | श्रीमती अफरोज जहॉं |
| ३२. | प्रा.शा. किराडपुरा नं.३ | श्रीमती सुनीता शेजवळ |
| ३३. | प्रा.शा. शाहबाजार | श्रीमती नाजेमा बेगम |
| ३४. | प्रा.शा. शाहबाजार | श्रीमती मुबीना आफरीन |
| ३५. | प्रा.शा. चेलीपुरा | श्रीमती कौसर बेगम |

| | | |
|---|---|---|
| ३६. | प्रा.शा. यशोधरा कॉलनी मराठी | श्रीमती छाया राऊत |
| ३७. | प्रा.शा. यशोधरा कॉलनी मराठी | श्रीमती संगीता बोर्से |
| ३८. | प्रा.शा. यशोधरा कॉलनी मराठी | श्रीमती पुष्पा गायकवाड |
| ३९. | प्रा.शा. यशोधरा कॉलनी उर्दु | श्रीमती सीमा जबीन |
| ४०. | प्रा.शा. यशोधरा कॉलनी उर्दु | श्रीमती समीना परवीन |
| ४१. | प्रा.शा. यशोधरा कॉलनी उर्दु | श्रीमती सुरैय्या बानो |
| ४२. | कें.प्रा.शा. सिडको एन-१२ | श्रीमती विघोतेकर सुवर्णा |
| ४३. | प्रा.शा. सिडको एन-११ | श्रीमती कुलकर्णी अंजली नंदकिशोर |
| ४४. | प्रा.शा. सिडको एन-९ | श्रीमती पोतदार मंजुषा |
| ४५. | प्रा.शा. सिडको एन-६ | श्रीमती एस.सी. बिडवई |
| ४६. | प्रा.शा. शताब्दीनगर | श्रीमती दुसाने अनिता सुधाकर |
| ४७. | प्रा.शा. शताब्दीनगर | श्रीमती शेळके सुशिला |
| ४८. | प्रा.शा. शताब्दीनगर | श्रीमती शेख हाजरा फातेमा |
| ४९. | प्रा.शा. गणेश कॉलनी | श्रीमती खान शहाना बेगम रहेमान अ. |
| ५०. | आंबेडकरनगर बालवाडी | श्रीमती कुलकर्णी एस.के. |
| ५१. | आंबेडकरनगर बालवाडी | श्रीमती पंडीत पी.के. |
| ५२. | फुलेनगर बालवाडी | श्रीमती सदावर्ते एस.एन. |
| ५३. | फुलेनगर बालवाडी | श्रीमती ठोंबरे ए. व्ही. |
| ५४. | गौतमनगर बालवाडी | श्रीमती बिऱ्हाडे एस.पी. (पंडित) |
| ५५. | गौतमनगर बालवाडी | श्रीमती महाजन व्ही.बी. |
| ५६. | सिध्दार्थनगर बालवाडी | श्रीमती पवार डी.एस. |
| ५७. | प्रा.शा. रोजेबाग (मराठी) | श्रीमती चुंचेकर अनिता जनार्दन |
| ५८. | प्रा.शा. रोजेबाग (उर्दु) | श्रीमती हाश्मी तहुरा सय्यद मसुद |
| ५९. | के.प्रा.शा. सिडको एन-७ | श्रीमती वंदना साळुबा सुरडकर |
| ६०. | प्रा. व माध्यमिक नारेगाव (मराठी) | श्रीमती पुष्पा आसाराम दाभाडे |
| ६१. | प्रा. व माध्यमिक नारेगाव (मराठी) | श्रीमती स्वाती भास्कर गौड |
| ६२. | प्रा. व माध्यमिक नारेगाव (मराठी) | श्रीमती रत्नप्रभा पंडीतराव खैरनार |
| ६३. | प्रा. व माध्यमिक नारेगाव (मराठी) | श्रीमती सुरेखा भिमसेन दाभाडे |
| ६४. | प्रा.शा. नारेगाव (उर्दु) | श्रीमती परवीन कौसर शेख बशिरोद्दीन |
| ६५. | प्रा.शाळा नारेगाव प्रकल्प | श्रीमती सुरेखा मोतीलाल परभणकर |
| ६६. | प्रा.शा. अशोकनगर | श्रीमती ज्योती संपत जाधव |
| ६७. | प्रा.शा. अशोकनगर | श्रीमती माधुरी व्यकंट ताजने |
| ६८. | प्रा.शाळा ब्रिजवाडी | श्रीमती अनिता शिवाजी साळवे |
| ६९. | प्रा.शा. मिसारवाडी | श्रीमती मंगला जगन्नाथ काळे |
| ७०. | के.प्रा.शा. मुकुंदवाडी | श्रीमती शेख रेहाना शेख शहानुर |
| ७१. | के.प्रा.शा. मुकुंदवाडी | श्रीमती मंदा विठ्ठलराव मिसाळ |
| ७२. | के.प्रा.शा. मुकुंदवाडी | श्रीमती संगीता केशवराव शीलवंत |
| ७३. | प्रा.शा. विठ्ठलनगर | श्रीमती पिंगळे शंकुतला बाबुराव |
| ७४. | प्रा.शा. चिकलठाणा | श्रीमती सविता भि. वाणी |
| ७५. | प्रा.शा. चिकलठाणा | श्रीमती नलिनी मं. पाटील |
| ७६. | प्रा.शा. विश्रांतीनगर | श्रीमती प्रतिभा विठ्ठलराव मांटे |
| ७७. | प्रा.शा. विश्रांतीनगर | श्रीमती देशमुख मिना |
| ७८. | प्रा.शा. विश्रांतीनगर | श्रीमती शिरसाळे सविता |
| ७९. | प्रा.शा. विश्रांतीनगर | श्रीमती मांटे सुजाता |
| ८०. | प्रा.शा. संजयनगर | श्रीमती विद्या नेमीनाथ कानडे |

| | | |
|---|---|---|
| ८१. | प्रा.शा. भारतनगर नं.२ | श्रीमती देशमुख माधुरी विठ्ठलराव |
| ८२. | संजयनगर प्रकल्प | श्रीमती आशा शेगावकर |
| ८३. | संजयनगर प्रकल्प | श्रीमती मंगला नाडे |
| ८४. | के.प्रा.शा. प्रियदर्शनी इंदिरानगर | श्रीमती मीरा मोरे |
| ८५. | प्रा.शा. एकनाथनगर | श्रीमती संगीता सोनवणे |
| ८६. | प्रा.शा. गारखेडा (मराठी) | श्रीमती आशा घायतिलक |
| ८७. | प्रा.शा. विष्णुनगर | श्रीमती प्रमिला तायडे |
| ८८. | प्रा.शा. जवाहर कॉलनी | श्रीमती आशा केनेकर |
| ८९. | प्रा.शा. हनुमाननगर | श्रीमती मंजुषा अमेशचंद चांदेकर |
| ९०. | प्रा.शा. हनुमाननगर | श्रीमती निलीमा राजेश्वर कवठेकर |
| ९१. | प्रा.शा. भारतनगर नं.१ | श्रीमती दुर्गा खराटे |
| ९२. | प्रा.शा. प्रियदर्शनी इंदिरानगर नं.१ | श्रीमती रेखा धोटे |
| ९३. | प्रा.शा. प्रियदर्शनी इंदिरानगर नं.२ | श्रीमती शिला मनगटे |
| ९४. | बालवाडी देवळाई म्हाडा | श्रीमती कामिनी घोरपडे |
| ९५. | प्रा.शा. प्रियदर्शनी इंदिरानगर (उर्दु) | श्रीमती समीना तडवी |
| ९६. | केंद्र प्रा.शा.बन्सीलालनगर | श्रीमती शालुबाई कांबळे |
| ९७. | प्रा.शा. पदमपुरा | श्रीमती बंसीले |
| ९८. | प्रा.शा. उस्मानपुरा | श्रीमती शेख आस्मा परवीन |
| ९९. | रमानगर बालवाडी | श्रीमती वानखेडे छाया |
| १०० | प्रा.शा. शहानुरवाडी | श्रीमती अरूणा नाईक |
| १०१. | प्रा.शा. नुतन कॉलनी | श्रीमती दिक्षित संध्या |
| १०२. | के.प्रा.शा. इंदिरानगर बायजीपुरा | श्रीमती कमल सांडु सोनवणे |
| १०३. | के.प्रा.शा. इंदिरानगर बायजीपुरा | श्रीमती छाया व्यकटराव चापोलिकर |
| १०४. | प्रा.शा.जिन्सी (मराठी) | श्रीमती विमल बाबुराव काथार |
| १०५. | प्रा.शा. रेंगटीपुरा (उर्दु) | श्रीमती नाजिया नसरीन जहिरूद्दीन |
| १०६. | प्रा.शा. जिन्सी / रेंगटीपुरा | श्रीमती बशीर फातेमा |
| १०७. | प्रा.शा. कैलासनगर | श्रीमती स्मिता सुरेश पुरी |
| १०८. | प्रा.शा. कैलासनगर | श्रीमती संगीता माणीकलाल शुक्ला |
| १०९. | प्रा.शा. कैलासनगर | श्रीमती सुनीता लिंबाजीराव कोल्हे |
| ११०. | प्रा.शा. रोहिदासपुरा | श्रीमती लक्ष्मी छगनराव बुरकुले |
| १११. | प्रा.शा. खोकडपुरा | श्रीमती मंगला नारायण वाहुळे |
| ११२. | प्रा.शा. खोकडपुरा | श्रीमती कुसुम रमेश जाधव |
| ११३. | प्रा.शा. पैठणगेट (उर्दु) | श्रीमती शबाना बेगम शेख बाबर |
| ११४. | के.प्रा.शा. हर्सुल गाव | श्रीमती चंद्रकला गणपत बकले |
| ११५. | के.प्रा.शा. हर्सुल गाव | श्रीमती रमा टेकचंद दुबे |
| ११६. | प्रा.शा. हर्सुल वसाहत | श्रीमती छाया छगन बकले |
| ११७. | प्रा.शा. हर्सुल वसाहत | श्रीमती सुर्यकला बालचंद पचलोरे |
| ११८. | प्रा.शा. सेंट्रल जेल | श्रीमती साधना नानाजी पवार |
| ११९. | प्रा.शा. सेंट्रल जेल | श्रीमती सुरेखा कैलास काळे |
| १२०. | प्रा.शा. हर्सुल उर्दु | श्रीमती जुफिशान जझा हकीम फैज करीम |
| १२१. | प्रकल्प फुलेनगर बालवाडी | श्रीमती महानंदा श्रीरंग काळे |
| १२२. | प्रकल्प फुलेनगर बालवाडी | श्रीमती पुनाबाई धासिंग हरणे |
| १२३. | के.प्रा.शा. बनेवाडी राहुलनगर प्रकल्प | श्रीमती गहिरे के.एम. |
| १२४. | के.प्रा.शा.बनेवाडी | श्रीमती पंडीत व्ही.जे. |
| १२५. | के.प्रा.शा.बनेवाडी | श्रीमती निकम इ.आर. |

| | | |
|---|---|---|
| १२६. | प्रा.शा. कांचनवाडी | श्रीमती संगिता मैंद |
| १२७. | प्रा.शा. नक्षत्रवाडी | श्रीमती तामगाडगे निर्मला |
| १२८. | प्रा.शा. विटखेडा | श्रीमती गायकवाड कविता |
| १२९. | प्रा.शा. वाल्मी | श्रीमती जाधव लता कडुबा |
| १३०. | के.प्रा.शा. बेगमपुरा | श्रीमती मृनाल पंडीत |
| १३१. | प्रा.शा. पोलिस हेड क्वॉर्टर | श्रीमती निलिमा कुलकर्णी |
| १३२. | प्रा.शा. जुनाबाजार | श्रीमती फरजाना बेगम |
| **बालवाडी सेविकाचे नाव** | | |
| ०१. | मनपा शाळा एकनाथनगर | श्रीमती बुगनाबी सय्यद युसूफ |
| ०२. | मनपा शाळा संजयनगर (म.) | श्रीमती शोभा तुळशीराम प्रधान |
| ०३. | मनपा शाळा संजयनगर (म.) | श्रीमती अंबिका तुकाराम गायकवाड |
| ०४. | मनपा शाळा सिल्लेखाना | श्रीमती जनाबाई भिवसन शेजुळ |
| ०५. | फंक्शन हॉल किराडपुरा | श्रीमती कुसूम अशोक अमृतफळे |
| ०६. | मनपा शाळा बडीगिरणी | श्रीमती परीगाबाई दाभाडे |
| ०७. | मनपा शाळा रोजेबाग (प्रकल्प) | श्रीमती अनिसा बेगम अजगर खाँ |
| ०८. | मनपा शाळा प्रियदर्शनी इंदिरानगर नं.२ | श्रीमती मिनाबाई बालकिशन पठाडियॉ |
| ०९. | मनपा शाळा संजयनगर (जिन्सी) | श्रीमती संगिता कर्नल |
| १०. | आंबेडकरनगर (फुलेनगर सिडको एन-७) | श्रीमती लक्ष्मी सत्यविजय काळे |
| ११. | मनपा शाळा नारेगांव | श्रीमती बेबी मदनलाल बांगरे |
| १२. | मनपा शाळा मुलींची उस्मानपुरा | श्रीमती बबीता इंगळे |
| १३. | मनपा शाळा शहानुरवाडी | श्रीमती कल्याणी सुनिल गायकवाड |

करीता सन २०१८-१९ च्या शैक्षणिक वर्षातील प्रथम सत्रात उपरोक्त १३२ बालवाडी शिक्षिका व १३ बालवाडी सेविका यांना दिनांक १५/०६/२०१८ ते दिवाळीच्या सुट्या लागेपर्यंत दिनांक ०३/११/२०१८ पर्यंतची मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजुर करण्यांत येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शिक्षण विभागात सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या एकूण १३२ (प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.०१ ते १३२ बालवाडी शिक्षिका) बालवाडी शिक्षिका व १३ (प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.०१ ते १३ सेविका) सेविका यांना सन २०१८-१९ च्या शैक्षणिक वर्षातील प्रथम सत्रात दिनांक १५/०६/२०१८ ते दिवाळीच्या सुट्या लागेपर्यंत दिनांक ०३/११/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ८० :</u>**

विषय :- वार्ड क्र.३६ नारेगाव (ब्रिजवाडी) राजेंद्रनगर अंतर्गत नारेगाव मांडकी रस्ता ते गणपती मंदिर राजेंद्रनगर नारेगाव रस्त्याचे ट्रिमिक्स कॉंक्रीटीकरण करणे, या कामाचे ठेकेदार श्री.त्र्यंबक विश्वनाथ बांगर यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.००% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.३३,४६,७६७/- पर्यंत करून घेणे अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्र.२०१८-AMCA-२८०७७५-४

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | उप अभि झोन क्र.०५, सिडको |
| २ | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.३६ नारेगाव (ब्रिजवाडी) राजेंद्रनगर अंतर्गत नारेगाव मांडकी रस्ता ते गणपती मंदिर राजेंद्रनगर नारेगाव रस्त्याचे ट्रिमिक्स कॉंक्रीटीकरण करणे. |

| | | |
|---|---|---|
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.स्थायी समिति सभा दिनांक ११/०१/२०१८ विषय क्र.१९० र.रू.३५,४९,६०२/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.३३,८०,५७३/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | --- |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | ०६/०३/२०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | १७/०३/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | तीन निविदा |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | श्री.त्र्यंबक विश्वनाथ बांगर | र.रू.३३,४६,७६७/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.००% कमी दराने |
| ०२. | श्री.निवृत्ती एल.सुर्यवंशी | र.रू.३४,४८,१८५/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.००% जास्त दराने |
| ०३. | श्री.विशाल विकास पाटील | र.रू.३५,४९,६०२/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.००% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | नाही |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | आहे. |

तरी विषयाकिंत काम ठेकेदार श्री.त्र्यंबक विश्वनाथ बांगर यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.००% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.३३,४६,७६७/- पर्यंत करुन घेणे अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

मा.सभापती : विषय क्र.८०,८१,८२,८३,८४,८५ मंजुर करण्यांत येतात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३६ नारेगाव (ब्रिजवाडी) राजेंद्रनगर अंतर्गत नारेगाव मांडकी रस्ता ते गणपती मंदिर राजेंद्रनगर नारेगाव रस्त्याचे ट्रिमिक्स कॉंक्रीटीकरण करणे, या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे ठेकेदार श्री.त्र्यंबक विश्वनाथ बांगर यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.००% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.३३,४६,७६७/- पर्यंत करून घेणे अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८१ :**

विषय :- वार्ड क्र.७९ न्यायनगर अंतर्गत स्व.पुंडलिक राऊत यांच्या पुतळा ते मा.उच्च न्यायालय संरक्षण भिंती पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. या कामाचे ठेकेदार मे.सिध्दी कन्स्ट्रक्शन यांचेकडून ०१% कमी दराने टेंडर र.रु.३९,०८,५४६.००/- पर्यंत करून घेणे अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्र.२०१७-AMCA-२४०५८२-८

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | अभियंता झोन क्र.६ |
| २ | कामाचे स्वरुप | कॉंक्रीटींग करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय. |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | ३९४८०२६.०० |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | ई महासेल निविदा सूचना दिनांक - - २०१८ |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | - |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | १३/०७/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | ०१ |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | मे.सिध्दी कन्स्ट्रक्शन | ३९०८५४६.०० | ०१% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | --- |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | मा.स्थायी समिती सभा दि.११/०८/२०१७ विषय क्र.७१ |

तरी विषयांकित काम ठेकेदार मे.सिध्दी कन्स्ट्रक्शन यांचेकडून ०.०१% कमी दराने निविदा भरली होती तथापी मा.आयुक्त महोदय यांचे दालनात झालेल्या चर्चेनुसार ठेकेदारांनी ०१% कमी दराने काम करण्यास संमती दिली आहे. करीता म्हणजेच टेंडर अटी /शर्तीतील भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७९ न्यायनगर अंतर्गत स्व.पुंडलिक राऊत यांच्या पुतळा ते मा.उच्च न्यायालय संरक्षण भिंती पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे, या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारक ठेकेदार मे.सिध्दी कन्स्ट्रक्शन यांचेकडून ०१% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.३९,०८,५४६.००/- पर्यंत करून घेणे अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८२ :**

विषय :- वार्ड क्र.३१ शिवनेरी कॉलनी अंतर्गत प्रतापगडनगर एन/९ म्हाडा येथील खुल्या जागेचे सुशोभिकरण करून विकसीत करणे, या कामाचे ठेकेदार श्री.पी.एस.टेंभुर्णीकर यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.३६,९७,५७४/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर

अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ :- टेंडर क्रमांक/Tender ID-2018-AMCA-275062-1

महाशय,

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | उप अभि झोन क्र.०५, सिडको |
| २ | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.३१ शिवनेरी कॉलनी अंतर्गत प्रतापगडनगर एन/९ म्हाडा येथील खुल्या जागेचे सुशोभिकरण करून विकसीत करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.स्थायी समिती सभा दिनांक ११/०१/२०१८ विषय क्र.२१५ र.रू.३६,९८,०००/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.३६,९७,९४४/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | --- |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | २६/०३/२०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | २८/०३/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | एक निविदा |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| **अ.क्र.** | **ठेकेदाराचे नाव व पत्ता** | **टेंडर रक्कम रुपये** | **पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त** |
|---|---|---|---|
| ०१. | श्री.पी.एस. टेंभुर्णीकर | र.रू.३६,९७,५७४/- | अं.प. दरापेक्षा ०.०१% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | नाही |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | वार्ड कार्यालया अंतर्गत विविध विकास कामे करणे. |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय |

तरी विषयांकित काम ठेकेदार श्री.पी.एस. टेंभुर्णीकर यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.३६,९७,५७४/- पर्यंत काम करुन घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३१ शिवनेरी कॉलनी अंतर्गत प्रतापगडनगर एन/९ म्हाडा येथील खुल्या जागेचे सुशोभिकरण करून विकसीत करणे, या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारक ठेकेदार श्री.पी.एस.टेंभुर्णीकर यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.३६,९७,५७४/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८३ :**

विषय :- वार्ड क्र.३१ शिवनेरी कॉलनी येथे आंबेडकर चौक ते बळीराम पाटील चौक पर्यंत पेव्हरब्लॉक बसविणे, या कामाचे ठेकेदार श्री.पी.एस.टेंभुर्णीकर यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.४०,४२,३९७/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ :- टेंडर क्रमांक/Tender ID-2018-AMCA-285640-1

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | उप अभि झोन क्र.०५, सिडको |
| २ | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.३१ शिवनेरी कॉलनी येथे आंबेडकर चौक ते बळीराम पाटील चौक पर्यंत पेव्हरब्लॉक बसविणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.स्थायी समिती सभा दिनांक ०१/०३/२०१८ विषय क्र.२९८ र.रू.४२,४४,९४१/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.४०,४२,८०१/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | --- |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | २६/०३/२०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | ११/०४/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | एक निविदा |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | श्री.पी.एस. टेंभुर्णीकर | र.रू.४०,४२,३९७/- | अं.प. दरापेक्षा ०.०१% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | नाही |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | मा.महापौर यांनी सूचविलेली अत्यावश्यक कामे. |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय |
| तरी विषयाकिंत काम ठेकेदार श्री.पी.एस. टेंभुर्णीकर यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.४०,४२,३९७/-पर्यंतकाम करुन घेणे अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३१ शिवनेरी कॉलनी येथे आंबेडकर चौक ते बळीराम पाटील चौक पर्यंत पेव्हरब्लॉक बसविणे, या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारक ठेकेदार श्री.पी.एस.टेंभुर्णीकर यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.४०,४२,३९७/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट सातारा-देवळाई या भागात भविष्यातील लोकसंख्या गृहीत धरून सक्षम स्त्रोताद्वारे स्वतंत्र पाणी पुरवठा योजना आखण्यासाठी शासन निर्णय क्र./संकीर्ण/२०१२/प्रक्र/२४/नवी-१६ दिनांक २७ जुन २०१२ नुसार सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नियुक्ती करणेकामी या क्षेत्रातील तज्ञ तांत्रिक सल्लागारांकडून ई-निविदाद्वारे निविदा मागविण्यात आल्या. त्यामध्ये एकूण ३ निविदाधारकांनी दर भरणा केला होता. या कामाची निविदा अंतर्गत तीन्ही निविदाधारकांचे तांत्रिक प्रस्ताव तपासून त्याचे मुल्यांकन केले. सदरची स्पर्धा ही Quality cost based system (70:30) या आधारावर करण्यात आली. सक्षम मान्यतेनुसार सर्वात जास्त गुण प्राप्त मे.यश इनोव्हेटीव सोल्युशन, एल.एल.पी. औरंगाबाद यांचेकडून निविदेमध्ये प्राप्त दरानुसार सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे करीता एकूण प्रकल्प किमंतीच्या ०.३५% या दराने व प्रकल्प व्यवस्थापन सेवा करीता एकूण प्रकल्प किमंतीच्या ०.६१% दराने काम करून घेण्यास मा.आयुक्त, मा.अतिरिक्त आयुक्त यांनी वाटाघाटीअंती मान्यता प्रदान केली आहे.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र. २०१८- AMCA-311377-1

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा विभाग) |
| २ | कामाचे स्वरुप | सातारा देवळाई करीता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, शासनास मान्यतेस्तव सादर करणे, महाराष्ट्र शासनाकडून तांत्रिक व आर्थिक मंजुरीसह निधी प्राप्त करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | नाही |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्या नियुक्तीकरीता निविदा मागविण्यात आल्या आहेत. |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | ई निविदा मार्फत |
| ५ | अ) निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत | २६/०४/२०१८ |
| | ब) निविदा उघडल्याचा दिनांक | १०/०८/२०१८ |
| ६ | निविदा किती वेळेस मागविल्या? | एक वेळेस |
| ७ | एकूण किती निविदा आल्या? | तीन |
| ८. | निविदा प्राप्त दर | --- |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ. क्र. | सल्लागाराचे नाव पत्ता | टेंडर रक्कम | | पुर्वगणकपत्रकापेक्षा टक्केवारी जास्त |
|---|---|---|---|---|
| | | सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे. | प्रकल्प व्यवस्थापन सेवा | २०% जास्त |
| १. | Ceinys tech Ltd, Nagpur | एकूण प्रकल्प किमंतीच्या ०.६५% | एकूण प्रकल्प किमंतीच्या १.९७% | |
| २. | Fortress Infrastructure Advisory Services, Mumbai | एकूण प्रकल्प किमंतीच्या ३.५% | एकूण प्रकल्प किमंतीच्या ३.५% | |
| ३. | Yash Innovative Solutions LLP, Aurangabad | एकूण प्रकल्प किमंतीच्या ०.३६% | एकूण प्रकल्प किमंतीच्या ०.६२% | |

| | | |
|---|---|---|
| ९ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? असल्यास कारणे नमुद करावीत. | नाही |
| १० | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | शासकीय निधी अंतर्गत ८०% राज्य शासन व २०% महानगरपालिका हिस्सा |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | शासकीय निधी अंतर्गत ८०% राज्य शासन व २०% महानगरपालिका हिस्सा |
| ११ | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | लागू नाही |
| १२ | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | नाही |
| तरी विषयांकित काम मे.यश इनोव्हेटीव सोल्युशन्स, एल.एल.पी. औरंगाबाद (प्रकल्प सल्लागार) यांच्याकडून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी वाटाघाटीअंती मान्यतेनुसार एकूण प्रकल्प किमंतीच्या ०.३५% या दराने व प्रकल्प व्यवस्थापन सेवेकरीता एकूण प्रकल्प किमंतीच्या ०.६१% असे एकूण ०.९६% दराने काम करून घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | | |

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट सातारा-देवळाई या भागात भविष्यातील लोकसंख्या गृहीत धरून सक्षम स्त्रोताद्वारे स्वतंत्र पाणी पुरवठा योजना आखण्यासाठी शासन निर्णय क्र./संकीर्ण/२०१२/प्रक्र/२४/नवी-१६ दिनांक २७ जुन २०१२ नुसार सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नियुक्ती करणेकामी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.यश इनोव्हेटीव सोल्युशन्स, एल.एल.पी. औरंगाबाद (प्रकल्प सल्लागार) यांच्याकडून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी वाटाघाटीअंती मान्यतेनुसार एकूण प्रकल्प किमंतीच्या ०.३५% या दराने व प्रकल्प व्यवस्थापन सेवेकरीता एकूण प्रकल्प किमंतीच्या ०.६१% असे एकूण ०.९६% दराने काम करून घेण्यास व करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ८५ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नागरी दलित वस्ती सुधार योजना २०१७-१८ अंतर्गत वार्ड क्र.११२ शिवाजीनगर अंतर्गत साईनगर, भारतनगर येथे १००,१५० मी.मी. व्यासाची डी.आय.के.-७ तसेच देशमुखनगर जलकुंभापासून ३०० मी.मी. व्यासाची डी.आय.के.-७ मुख्य जलवाहीनी टाकून बुस्टर पंप बसवुन पाणी पुरवठा वितरण करणे बाबतचे एकुण अंदाजपत्रक रक्कम रूपये ४९,९९,५७८/- चे म.जी.प्रा.दरसुची सन २०१६-१७ नुसार तयार करण्यात आलेले आहे. सदर प्रसतावास विहीत नमुन्यामध्ये प्रशासकीय मान्यतेसाठी मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे जा.क्र./मनपा/श.अ./का.अ./९७/२०१८ दि.०८/०३/२०१८ अन्वये सादर करण्यात आला होता.

मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडून सदरील कामासाठी जा.क्र./२०१८/न.पा.प्र./द.व.सु.यो.प्र.मा/मनपा औ कावि/८४३/२०१८ दि.३१/०३/२०१८ नुसार रक्कम रूपये ४९,९९,५७८/- ला नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

करीता अंदाजपत्रक रूपये ४९,९९,५७८/- किमंतीच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथापी विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नागरी दलित वस्ती सुधार योजना २०१७-१८ अंतर्गत वार्ड क्र.११२ शिवाजीनगर अंतर्गत साईनगर, भारतनगर येथे १००,१५० मी.मी. व्यासाची डी.आय.के.-७ तसेच देशमुखनगर

जलकुंभापासून ३०० मी.मी. व्यासाची डी.आय.के.-७ मुख्य जलवाहीनी टाकून बुस्टर पंप बसवुन पाणी पुरवठा वितरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये ४९,९९,५७८/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८६ :**

०१. प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरास जायकवाडी धरणावरील ५६ व १०० दलली क्षमतेच्या दोन मुख्य योजनांच्या पंपांद्वारे पाणी उचल करुन पाणी पुरवठा करण्यात येतो. औरंगाबाद शहर हे जायकवाडी जलाशयापासून १५९ मीटर उंचीवर आहे. उचल होणारे पाणी परिमाण लोकसंख्येच्या प्रमाणात तोकडे आहे. शहराच्या १५ लक्ष लोकसंख्येसाठी मागणी व अत्यंत कमी उपलब्धता, यामुळे शहरातील अपुऱ्या टाक्यांमुळे असलेली कमी साठवण क्षमता, परिणामी ६० ते ७० टक्के परिसरांना बायपासद्वारे होणारा पाणी पुरवठा इत्यादी कारणामुळे शहर व सिडको परिसराच्या पाणी वितरणामध्ये असमतोलपणा व विस्कळीतपणा निर्माण होतो. उपरोक्त बाबी पाहता पाणी पुरवठा सुधारणांसाठी प्रशासकीय तज्ञांची नियुक्ती करण्याचे प्रस्तावीत आहे.

०२. यासाठी दिनांक १५.०६.२०१८ रोजी वर्तमानपत्रांमध्ये स्वारस्य सुचना (Expression of Interest) प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार प्रशासकीय सल्लागारासाठी १) युनिटी आय.ई.वर्ल्ड, पुणे आणि २) श्री. रत्नाकर वाघमारे, नांदेड यांचे अर्ज प्राप्त झाले.

०३. Expression of Interest नुसार स्वारस्य दाखविलेल्या तज्ञांपैकी योग्य तज्ञांची निवड करण्यासाठी सर्व संबंधितांना प्रत्यक्ष मुलाखतीसाठी बोलावून अनुषंगीक चर्चा करणे, मुलाखत घेणे किंवा प्राप्त प्रस्तावावर उचित तो निर्णय घेणे, या मध्ये शहराला उचित पाणी मिळण्याच्या दृष्टीने सर्व बाबी, करावयाची कामे, द्यावयाचा मोबदला इत्यादीवर निर्णय घेऊन सक्षम प्राधिकरणाकडे सादर करण्यासाठी दि. ०३.०८.२०१८ रोजी कार्यालयीन आदेशाद्वारे एक समिती गठीत करण्यात आली. समितीमध्ये आयुक्त - अध्यक्ष, उपायुक्त (आस्थापना)- सदस्य, मुख्य लेखाधिकारी- सदस्य तसेच कार्यकारी अभियंता- सदस्य सचिव यांची नेमणुक करण्यात आली होती.

०४. Expression of Interest नुसार स्वारस्य दाखविलेल्या प्रशासकीय तज्ञांची दि. २०.०८.२०१८ रोजी सकाळी १०.०० वाजता गठीत समिती मार्फत मुलाखत संपन्न झाली.

०५. मुलाखतीस श्री. रत्नाकर के. वाघमारे, नांदेड व युनिटी आय.ई. वर्ल्ड, पुणे चे संचालक श्री. महेश पाठक हे दोघे उपस्थित राहीले.

०६. श्री. रत्नाकर के. वाघमारे, नांदेड हे सेवानिवृत्त उप आयुक्त असून नांदेड महानगरपालिका सेवेत असतांना त्यांना पाणी पुरवठा विषयक प्रशासकीय बाबींचा प्रदीर्घ पुर्वानुभव आहे. त्यांनी नांदेड महानगरपालिकेमध्ये मागील १२ वर्षापासून उप आयुक्त म्हणून काम पाहीले आहे व दिनांक ३१.०७.२०१८ रोजी त्यांनी Voluntary सेवानिवृत्ती घेतली आहे. एकुण ३२ वर्षांच्या शासकीय सेवेमध्ये त्यांनी शहरी भागातील पाणी पुरवठा योजनांचे JNNURM, Service Level Benchmark वाढविणे, पाणीपट्टीचे Reforms इ. सारखे महत्वकांक्षी प्रकल्प यशस्वीरीत्या राबविले आहेत. ज्यामध्ये योजनेचे प्रत्यक्ष बांधकाम, Non Revenue Water कमी करणे इ. उपांगे होती.

०७. मुलाखतीत त्यांनी म्हटले की, सर्वात महत्वाचे म्हणजे सर्वांना पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणे Service delivery (out come) हे असते, आणि हे साध्य झाल्यानंतर इतर Service Level Benchmarks मध्येही प्रगती साधता येते. JNNURM मध्ये त्यांनी नांदेड महानगरपालिकेचे काम देशात उत्कृष्ट असल्याचे नमुद केले. अवैध नळजोडण्यांबद्दल त्यांनी म्हटले की, पिण्याचे पाणी हे सर्वांची गरज असल्यामुळे त्या जोडण्या वैध करुन त्यांना Tax Net मध्ये आणणे हीच सर्वात चांगली उपाययोजना आहे. शहरातील झोपडपट्टीतील लोकांसाठी ५०% सुट, Stand Post वरुन पाणी घेतल्यास विशेष पाणीपट्टी इ. सारखे

पाणीपट्टी Reforms त्यांनी नांदेडमध्ये आणल्याचे नमुद केले. त्यांनी सांगितले की, लोकांची विश्वासाहर्ता संपादन केल्यानंतर पाण्याचा अपव्यय होण्यासारखे विषय देखील हाताळता येतात. कंत्राटदार काम करण्यास नकार देतात असे विचारल्यावर त्यांनी मत मांडले की, तसे असल्याचे कारण नाही, काम होण्याच्या आणि करुन घेण्याच्या दृष्टीने त्यांना सहाय्य करुन काम करुन घेता येते. या सर्व उपाय योजनांमुळे नांदेड येथे पिण्याच्या पाण्याची योजना यशस्वीरीत्या राबवून पाणीपट्टी भरणारी लोकसंख्या ही जवळपास १००% झालेली असल्याचे त्यांनी नमुद केले.

०८. पाणी पुरवठ्याशिवाय त्यांनी रस्ते प्रकल्प, मलनिःसारण, स्टॉर्म वॉटर ड्रेनेज, पुलांचे बांधकाम तसेच घरकुल योजने अंतर्गत प्रकल्प, पाणी व उर्जा लेखा परिक्षण, प्रशासकीय ई-गव्हर्नन्स, मालमत्ता कर सक्षमपणे राबविणे, पाणी पुरवठा व मलनिःसारण अंतर्गत १००% महसुल मिळविण्यासाठी प्रयत्न करणे, पीपीपी तत्वावर महानगरपालिकेत शहर बस सेवा बाबत कार्यवाही, पीपीपी तत्वावर महानगरपालिका प्रशासकीय इमारतीचे बांधकाम आदि कामे यशस्वीरीत्या पुर्ण केल्याची बाब नमुद केली आणि त्यांनी प्रशासकीय तज्ञ म्हणून महानगरपालिकेस सेवा देण्यास ईच्छुक असल्याचे सांगितले.

०९. पाणी पुरवठा विभागातील त्यांचा विचार आणि औरंगाबाद शहरातील पाणी पुरवठा सुधारण्यासाठी त्यांचा दृष्टीकोन व धोरण समितीतील सदस्यांना योग्य वाटला. सदरील कामास ते पुर्ण वेळ देण्यास तयार असल्यामुळे प्रशासकीय सल्लागार या पदासाठी ते उपयुक्त ठरतात अशी समितीतील सर्व सदस्यांनी शिफारस केली.

१०. उपस्थित श्री. महेश पाठक यांची युनिटी आय.ई. वर्ल्ड ही संस्था जरी वेगवेगळ्या शहरात सल्लागाराचे काम करीत असली तरी महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागात त्यांचा कुठला एक अधिकारी प्रशासकीय सल्लागार म्हणून पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी महत्वाची भुमिका राबवु शकेल असे समितीला वाटले नाही. या शिवाय समांतर योजनेमध्ये या कंपनीला स्वतंत्र अभियंता म्हणून काम केले असतांनाही सदर योजनेचे काम समाधानकारकरीत्या झालेले नाही.

११. सद्यस्थितीत औरंगाबाद पाणी पुरवठा विभागाला एक सक्षम प्रशासकीय सल्लागाराची नितांत आवश्यकता आहे. औरंगाबाद महानगरपालिकेतील उपायुक्त दर्जाचे अधिकाऱ्याचे रिक्त पद, पाणी पुरवठा विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची कमतरता तसेच पाणी पुरवठा योजना रखडणे या सर्व कारणांमुळे एक अनुभवी प्रशासकीय अधिकारी जो या खात्याला पुर्णपणे चालना देवू शकेल त्यांची आवश्यकता आहे. समितीने शिफारस केल्या प्रमाणे श्री. रत्नाकर वाघमारे हे या पदासाठी उपयुक्त आहेत.

१२. शहर विकासासाठी वेगवेगळ्या योजनेअंतर्गत नियुक्त सल्लागारांना साधारणतः रु. १ ते २ लाख पर्यंत प्रतिमाह मानधन दिले जात असल्याचे आणि श्री. रत्नाकर के. वाघमारे यांनी वरीष्ठ प्रशासकीय पदावर काम केलेले असून त्यांची कार्यक्षमता व प्रशासकीय अनुभव हा इतर अशा प्रकारच्या सल्लागारापेक्षा जास्तच असल्याचे समितीतील सदस्यांना वाटले. याशिवाय ते औरंगाबाद शहरातील पाणी पुरवठा योजनेतील स्थिती सुधारण्यासाठी मोलाचे योगदान देणार असल्याचाही सर्वांना विश्वास वाटला. त्यामुळे त्यांना प्रशासकीय सल्लागार कामासाठी किमान दरमहा रु. ७५०००/- (सर्व करांसहीत) मानधन देणे योग्य राहील अशी समितीने शिफारस केली.

१३. वरील सर्व बाबी पाहता श्री. रत्नाकर के. वाघमारे, नांदेड यांची पाणी पुरवठ्यासाठी प्रशासकीय सल्लागार म्हणून नियुक्ती करणे आणि त्यांना प्रशासकीय सल्लागार कामासाठी किमान दरमहा रु. ७५०००/- मानधन सर्व करांसहीत देण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर अवलोकनार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

सौ.शिल्पाराणी वाडकर : मानधन जास्तीचे वाटते, यामध्ये योग्य तो निर्णय घ्यावा.

मा.सभापती : स.सदस्या यांनी मानधन जास्तीचे वाटत असल्याची सूचना केली, त्याबाबत मा.आयुक्तांनी मानधनामध्ये वाटाघाटी कराव्या व मानधनाबाबत निर्णय घ्यावा, ठरावास मंजूरी देण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरास जायकवाडी धरणावरील ५६ व १०० दलली क्षमतेच्या दोन मुख्य योजनांच्या पंपाद्वारे पाणी उचल करून पाणी पुरवठा करण्यात येतो. औरंगाबाद शहर हे जायकवाडी जलाशयापासून १५९ मीटर उंचीवर असल्याने उचल होणारे पाणी परिमाण लोकसंख्येच्या प्रमाणात तोकडे असून शहराच्या १५ लक्ष लोकसंख्येसाठी मागणी व अत्यंत कमी उपलब्धता यामुळे शहरातील अपुऱ्या टाक्यांमुळे असलेली कमी साठवण क्षमता, परिणामी ६० ते ७० टक्के परिसरांना बायपासद्वारे होणारा पाणी पुरवठा इत्यादी कारणामुळे, शहर व सिडको परिसराच्या पाणी वितरणामध्ये असमतोलपणा व विस्कळीतपणा निर्माण होतो, याकरीता पाणी पुरवठा सुधारणांसाठी श्री.रत्नाकर के. वाघमारे, नांदेड यांची पाणी पुरवठ्यासाठी प्रशासकीय सल्लागार कामासाठी किमान दरमहा रू.७५०००/- मानधन सर्व करांसहीत यामध्ये सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मा.आयुक्त यांनी संबंधीतासह वाटाघाटीकरून मानधनाबाबत मा.आयुक्त यांनी निर्णय घ्यावा, यासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८७ :**

विषय :- औरंगाबाद पाणी पुरवठा योजना-जायकवाडी उद्‌भव ते फारोळा जलशुध्दीकरण केंद्र दरम्यान असलेल्या ७०० मीमी व १२१९ मीमी व्यासांच्या अशुध्द उद्धरण वाहीन्यांची व अनुषंगीक उपांगाची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे.

संदर्भ :- Tender ID-2018-AMCA-169714-6

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा विभाग) |
| २ | कामाचे स्वरुप | औरंगाबाद पाणी पुरवठा योजना-जायकवाडी उद्‌भव ते फारोळा जलशुध्दीकरण केंद्र दरम्यान असलेल्या ७०० मीमी व १२१९ मीमी व्यासांच्या अशुध्द उद्धरण वाहीन्यांची व अनुषंगीक उपांगाची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.सर्वसाधारण सभा दि.१३/१०/२०१६ विषय क्र.६८० नुसार पुर्वगणकपत्रक र.रू.६८,८५,५१०/- मान्य झाले आहे. |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | रूपये ६५,५७,६२८/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | ई निविदा मार्फत |
| ५ | अ) निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत | ०३/०३/२०१८ |
| | ब) निविदा उघडल्याचा दिनांक | ०६/०३/२०१८ |
| ६ | निविदा किती वेळेस मागविल्या? | सहा वेळेस |
| ७ | एकूण किती निविदा आल्या? | एक |
| ८. | निविदा प्राप्त दर | निविदा दरापेक्षा २०% जास्त दराने |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | निविदा रक्कम रु. | भरलेले दर | पुर्वगणकपत्रकापेक्षा टक्केवारी जास्त | Bid Rank |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | नुर कन्स्ट्रक्शन,औरंगाबाद | ६५,५७,६२८/- | ७८,६९,१५४/- | २०% जास्त | L-1 |

| | | |
|---|---|---|
| ९ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |

| | | |
|---|---|---|
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? असल्यास कारणे नमुद करावीत. | होय, अंदाजपत्रक मजिप्राच्या दरसुची सन २०१५-१६ नुसार असणे, इ.मुळे प्राप्त २०% जास्त दराच्या निविदेचे सन २०१६-१७ प्रमाणे दर घेऊन तुलनात्मक विवरण तयार केले असता वाटाघाटी व सक्षम मंजुरीअंती कार्यवाही करून १५.६२% जास्त दराच्या निविदेची शिफारस करण्यात आली. |
| १० | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | सन २०१६-१७ ए.ओ.एस.जी. मधून |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ११ | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | लागू नाही |
| १२ | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय |
| तरी विषयाकिंत काम ठेकेदार नुर कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांचेकडून वाटाघाटीअंती मान्यतेनुसार निविदा रक्कम रूपये ६५,५७,६२८/- पेक्षा १५.६२% जास्त दराने म्हणजेच रक्कम रूपये ७५,८१,९३०/- पर्यंत करून घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | | |

मा.सभापती : विषय क्र.८७ मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजना-जायकवाडी उद्‌भव ते फारोळा जलशुध्दीकरण केंद्र दरम्यान असलेल्या ७०० मीमी व १२१९ मीमी व्यासांच्या अशुध्द उद्धरण वाहीन्यांची व अनुषंगीक उपांगाची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे, या कामासाठी प्राप्त निविदाधारक ठेकेदार नुर कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांचेकडून वाटाघाटीअंती ठरल्यानुसार निविदा रक्कम रूपये ६५,५७,६२८/- पेक्षा १५.६२% जास्त दराने म्हणजेच रक्कम रूपये ७५,८१,९३०/- पर्यंत करून घेण्यास व करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शिक्षण विभागामार्फत सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षात एकूण ७२ शाळेतील इयत्ता बालवाडी ते दहावी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या (सर्व शिक्षा अभियान योजने अंतर्गत गणवेशासाठी ज्या लाभार्थ्यांना लाभ मिळाले अशा लाभार्थीना वगळून उर्वरीत वंचित विद्यार्थ्यांसाठी) विद्यार्थ्यांसाठी शालेय गणवेश खरेदीसाठी प्रती विद्यार्थी रू.६००/- (ज्यात- दोन गणवेश खरेदी) प्रमाणे एकूण ६१४४ विद्यार्थ्यांना एकूण रक्कम रू.३६८६४००/- (अक्षरी छत्तीस लक्ष शह्यांशी हजार चारशे रूपये मात्र) खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजने अंतर्गत करण्यात येईल.

| अ.क्र. | केंद्रीय शाळेचे नाव | एकूण विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| ०१. | कें.प्रा.शा. बेगमपुरा | ४४४ |
| ०२. | नु.मा.शा. ज्युब्लीपार्क | २८७ |
| ०३. | कें.प्रा.शा. किराडपुरा नं. १ (उर्दु) | ६९१ |
| ०४. | कें.प्रा.शा. सिडको एन-१२ | ३३७ |
| ०५. | कें.प्रा.शा. सिडको एन-७ | १३७७ |
| ०६. | कें.प्रा.शा. मुकुंदवाडी | ६१६ |
| ०७. | कें.प्रा.शा. प्रियदर्शनी इंदिरानगर | ४०३ |
| ०८. | कें.प्रा.शा. बन्सीलालनगर | ५०० |

| | | |
|---|---|---|
| ०९. | कें.प्रा.शा. इंदिरानगर, बायजीपुरा | ५९२ |
| १०. | कें.प्रा.शा. हर्सुल गांव (म.) | ३९९ |
| ११. | कें.प्रा.शा. बनेवाडी | ४९८ |
| | **एकूण लाभार्थी -** | **६१४४** |

सदर लाभार्थीना शिक्षण विभागांतर्गत लेखाशिर्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजनेमध्ये उपलब्ध सन २०१८-१९ मुळ अर्थसंकल्पात रू.३५.०० लक्ष तरतुद उपलब्ध आहे. सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पात अधिन राहून गतवर्षाप्रमाणे याही वर्षी प्रत्येक लाभार्थीस रूपये ६००.०० याप्रमाणे गणवेश खरेदीसाठी अनुदान शालेय व्यवस्थापन समितीच्या सचिव तथा संबंधीत शाळेचे मुख्याध्यापकांच्या नांवे खालील निम्न निर्देशानुसार अनुदान वाटप करण्याचे मानस आहे. गणवेश खरेदी करीता लागणारी वाढीव रक्कमेची तरतुद सुधारीत अर्थसंकल्पात करण्यात यावी.

०१. गणवेशाकरीता कापडाची खरेदी शाळा व्यवस्थापन समितीने करावी. सदर कापडाची खरेदी करतांना कोणत्याही राज्य / केंद्र शासनाच्या सहकारी संस्था, राष्ट्रीय वस्त्रोद्योग संस्था किंवा इतर संस्था यांना प्राधान्य देण्यात येवू नये.

०२. शाळांनी गणवेश कपडाच्या खरेदीसाठी कमीत कमी तीन पुरवठादारांसाठी अटी व शर्तीसह दरपत्रके मागवावीत. शाळांनी दरपत्रके मागवितांना त्यामध्ये कापडांचे विवरण (Discription), वैशिष्ट्ये (Specification), रंग (Colour), मुले व मुलींसाठी वेगवेगळे नग (Quantity) व पुरवठा कालावधी नमूद करावा.

०३. शाळा व्यवस्थापन समितीस कापडाची वैशिष्ट्ये (Specification) माहित नसल्यास दरपत्रके मागवितांना आवश्यक असलेल्या गणवेश कापडाचा नमूना पुरवठादारास पाठवावा व त्यानुसार दरपत्रके मागवावित.

०४. दरपत्रके मागविण्याचा कालावधी पूर्ण झाल्यावर शाळा व्यवस्थापन समितीने दरपत्रके उघडून अटी व शर्ती पूर्ण करणार व कमीत कमी दर ज्या पुरवठादाराचे असतील, त्या पुरवठादारास कापड पुरवठा करण्याकामी पुरवठा आदेश निर्गमित करावा.

०५. प्रत्येक शाळा व्यवस्थापन समितीने त्यांच्या शाळेतील पात्र लाभार्थ्यांच्या वयोगटानुसार व विद्यार्थ्यांच्या मापानुसार (साईज प्रमाणे) मुलांसाठी आणि मुलींसाठी लागणाऱ्या कापडाची यादी तयार करून कापडाची खरेदी करावी.

०६. कापडाची शिलाई करणेकामी संबंधीत शाळा व्यवस्थापन समितीने अटी व शर्तीसह दरपत्रके मागवावीत. गणवेश कापड व शिलाई यासाठी मंजूर तरतुदीच्या अधीन राहून वेगवेगळी दरपत्रके मागवावीत.

०७.गणवेश कापड व शिलाई यांच्या देयकाची अदायगी संबंधीत शाळा व्यवस्थापन समितीने धनादेशाद्वारे करावी. रोख स्वरूपात अदायगी करू नये.

०८. शाळा स्तरावर दिनांकनिहाय संपूर्ण हिशोब ठेवण्यात यावा.

०९. गणवेश शिवुन झाल्यानंतर त्याची तांत्रिक समितीद्वारे तपासणी करून घेण्यात यावी. त्याचा योग्य अहवाल प्राप्त झाल्यानंतर मंजूर तरतुदीमधील रक्कम शिल्लक असल्यास, सदर रक्कम त्याच आर्थिक वर्षात मनपा स्तरावर जमा करावी व विनियोग प्रमाणपत्र सादर करून त्याचे रेकॉर्ड ठेवण्यात यावे.

करीता वरीलप्रमाणे एकूण लाभार्थी संख्या ६१४४ करीता प्रत्येकी रू.६००/- प्रमाणे एकूण रक्कम रू.३६८६४००/- ही उपरोक्तप्रमाणे सर्व शाळांच्या शालेय व्यवस्थापन समिती (सचिव तथा मुख्याध्यापक) यांच्या नांवे RTGS द्वारे/धनादेशाद्वारे खात्यांवर अनुदान वर्ग करण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर : महाराणा एजन्सिकडुन जे वसुलीसाठी कर्मचारी लावण्यात आले होते ते कर्मचारी दुसऱ्या विभागांमध्ये काम करत आहेत. वसुली सारखे महत्वाचे काम दिलेले असतांना सुध्दा दुसऱ्या विभागात का काम करत आहेत? ज्या कामासाठी त्यांना घेण्यात आले आहे तेच काम त्यांनी करावे.

मा.सभापती : वसुलीसाठी नेमलेल्या कर्मचाऱ्यांना वसुलीचेच काम देण्यात यावे. यामध्ये श्री.भालसिंग साहेब लक्ष घालावे. विषय क्र.८८ मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शिक्षण विभागामार्फत सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षात एकूण ७२ शाळेतील इयत्ता बालवाडी ते दहावी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या (सर्व शिक्षा अभियान योजने अंतर्गत गणवेशासाठी ज्या लाभार्थ्यांना लाभ मिळाले अशा लाभार्थींना वगळून उर्वरीत वंचित विद्यार्थ्यांसाठी) विद्यार्थ्यांसाठी शालेय गणवेश खरेदीसाठी प्रती विद्यार्थी रू.६००/- (ज्यात- दोन गणवेश खरेदी) प्रमाणे एकूण ६१४४ विद्यार्थ्यांना एकूण रक्कम रू.३६८६४००/- (अक्षरी छत्तीस लक्ष शह्यांशी हजार चारशे रूपये मात्र) च्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यांत येते. तसेच एकूण लाभार्थी संख्या ६१४४ करीता प्रत्येकी रू.६००/- प्रमाणे एकूण रक्कम रू.३६८६४००/- ही उपरोक्तप्रमाणे सर्व शाळांच्या शालेय व्यवस्थापन समिती (सचिव तथा मुख्याध्यापक) यांच्या नांवे RTGS द्वारे/धनादेशाद्वारे खात्यांवर अनुदान वर्ग करण्यासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगीताने सभा संपल्याचे जाहीर केले.

**दिलीप सुर्यवंशी**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद